## केंद्र पुरस्कृत
## एकात्मिक बाल विकास सेवा योजना

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची सुरूवात दि.२ ऑक्टोबर १९७५ साली प्रायोगिक तत्वावर मुलांना सर्वांगीण सेवा देणेच्या उद्देशाने सुरू करणेत आली. या योजनेची सुरूवात अमरावती जिल्ह्यातील धारणी या आदिवासी व धारावी (मुंबई) या नागरी प्रकल्पाच्या स्थापने पासून महाराष्ट्रात झाली.

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना कशासाठी?

- ❖ देशाच्या मानवी साधनसंपदेचे संवर्धन करणेसाठी.
- ❖ कोवळया बालवयातच मुलांच्या शरीराच्या, मनाच्या आणि सामाजिक जाणीवेच्या विकासाचा भरभक्कम पाया धालणेसाठी.
- ❖ बालमृत्यू, शारिरीक अपंगत्व, कुपोषण, शाळाशिक्षणात प्रगति असूनही शिक्षण अर्धवट सोडावे लागण्याची परिस्थिती आणि विकसनक्षमतेची प्रतिकुलता यांच्यामूळे उदभवणारा अपव्यय टाळणेसाठी आणि,
- ❖ बाल विकासाच्या क्षेत्रामध्ये जनतेचा सामुहिक सहभाग लाभावा आणि बाल विकासाच्या कार्यक्रमाला स्वयंपर्णता प्राप्त व्हावी यादृष्टीने चालना देण्यसाठी.

## एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा उद्देश

- ❖ ० ते ६ वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.
- ❖ मुलांचा योग्य शारिरीक, मानसिक, व सामाजिक विकासाचा पाया घालणे.
- ❖ बालमृत्यू, कुपोषण व शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे.
- ❖ बाल विकासाला चालना मिळावी म्हणून विविध विभागांमध्ये धोरण व अंमलबजावणी या बाबत परिणामकारक समन्वय साधणे.
- ❖ योग्य पोषण व आरोग्य विषयक शिक्षणाद्वारे बालकांचे सर्वसामान्य आरोग्य व त्यांच्या पोषण विषयक गरजांकडे लक्ष पुरविण्या बाबत मातांची क्षमता वाढविणे.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजने मार्फत दिल्या जाणा-या सेवा

- ❖ पूरक पोषण आहार
- ❖ लसीकरण
- ❖ आरोग्य तपासणी
- ❖ संदर्भ सेवा
- ❖ पोषण व आरोग्य शिक्षण
- ❖ अनौपचारीक शालेय पूर्व शिक्षण

## लाभार्थी गट :-

- ❖ ० ते ६ वयोगटातील मुले
- ❖ गरोदर माता व स्तनदा माता
- ❖ किशोरवयीन मुली
- ❖ १५ ते ४५ वयोगटातील स्त्रिया

## पूरक पोषण आहारासाठी लाभार्थी निकष :-

| | | |
|---|---|---|
| १ | ६ ते ३ वर्षे वयोगट | सर्व्हेप्रमाणे सर्व लाभार्थी.<br>(टी.एच.आर) घर पोहोच आहार पुरवठा. |
| २ | ३ ते ६ वर्षे वयोगट | अंगणवाडी पटावर सर्व्हेप्रमाणे नोंदविलेली सर्व बालके<br>बचत गटामार्फत अंगणवाडीत आहार वाटप. |
| ३ | गरोदर व स्तनदा माता | सर्व्हेप्रमाणे सर्व गरोदर,स्तनदा माता<br>(टी.एच.आर) घर पोहोच आहार पुरवठा. |
| ४ | किशोरवयीन मुली | शाळेत न जाणा-या तीन मुलीची दर सहा महिन्याने निवड करणे<br>बचत गटामार्फत अंगणवाडीत आहार वाटप. |

## एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे महत्वाचे फायदे पुढिल प्रमाणे आहेत

- सदर योजने अंतर्गत आहार, आरोग्य व शिक्षण विषयीच्या सेवा एकत्रितपणे दिल्या जातात.
- या कार्यक्रमामध्ये स्त्रिया व मुले या सारख्या जोखमीच्या तसेच दुर्लक्षित असलेल्या लाभार्थींना प्राधन्य दिले जाते. स्थनिक पूरक पोषण आहारामूळे लाभार्थींची उष्मांक (३०० ते ३५० ग्रॅम) / प्रथिने (१० ते १२ग्रॅम) यांची दैनंदिन गरज भागते.
- वृद्धीपत्रकाचा नियमीत वापर केल्यामुळे बालकांच्या वजनातील वाढ / रोध वेळीच लक्षात येवून कुपोषीत बालकांना संदर्भ सेवेद्वारे वैद्यकिय औषधोपचार उपलब्ध होवून त्यांची श्रेणी सुधारणेस मदत होत व त्यामूळे मुलांमधील कुपोषण, अर्भक मृत्यूदर यामध्ये लक्षणिय घट झालेली अढळून येते.
- अंगणवाडी कार्यरत असलेल्या गावामध्ये मुलांना नियमीतपणे लसीकरण मिळते व त्यामूळे लसीकरणामध्ये वाढ वसेच मुलांचे शाळेतील गळतीचे प्रमाणही कमी होते.
- आरोग्य व आहारविषयक प्रशिक्षणमुळे महिलांचे दैनंदिन जीवनात सुधारणा होवू शकते.

## अंगणवाडीचे महत्व

- मुलांचा सर्वांगिण विकास होतो.
- सर्व मुलें एकत्र खेळल्या मुळे सामाजिक विकासाचा पाया घातला जातो.
- हसत खेळत शिक्षण मिळते.
- पूरक पोषण आहार मिळाल्याने शारिरीक वाढीस मदत होते.
- अनौपचारीक शिक्षणाच्या बरोबर आरोग्य तपासणी, औषधोपचार इ. सेवा मिळतात.
- मुलांमध्ये शाळेची गोडी व आवड निर्माण होते.

- अंगणवाडी सुरु करण्याचे निकष

| | | |
|---|---|---|
| नियमीत अंगणवाडी | - | ४०० ते ८०० लोकसंख्या |
| मिनी अंगणवाडी | - | १५० ते ३०० लोकसंख्या |

## <u>नाविन्यपूर्ण उपक्रम</u>

**डिजीटल अंगणवाडी संकल्पना**

जिल्हयात डिजीटल अंगणवाडी केंद्रामध्ये टी.व्ही., सी.डी., प्लेअर, मॅट, बोलक्या भिंती, सजावट करण्यात आल्या असून त्यासाठी खर्च लोकसहभागातून करण्यात येत आहे, त्यामुळे बालकांची उपस्थिती व अनौपचारिक शिक्षणामध्ये मोठया प्रमाणात बदल झाला आहे. २६ जानेवारी २०१२ पर्यंत स्वतःच्या इमारती असणा-या अंगणवाडयामध्ये डिजीटल अंगणवाडया करण्याचे उददीष्ट ठरवून दिले आहे.

## महिला व बाल कल्याण विभाग – जिल्हा परिषद अहमदनगर
## सन २०११-१२
## विभागांतर्गत राबविण्यात येणा-या योजना (जिल्हा परिषद सेस)

| अ.क्र. | योजनेचे नांव | तरतूद | थोडक्यात स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | बाल कल्याण / एबाविसे योजनेतील साहित्य खरेदीसाठी जाहिरात खर्च व इतर सादिल | ३.०० | कार्यालयीन कामकाजासाठी व निविदा प्रक्रियेसाठी सादिल खर्च केला जातो. |
| २ | महिलांसाठी समुपदेशन/मदत केंद्र चालविणे | ३.०० | कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसिक दृष्टया असंतुलीत महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी ही योजना राबविली जाते. |
| ३ | महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा | १.०० | पंचायत समिती व जिल्हा परिषद मध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे जिल्हयात व जिल्हयाबाहेर पंचायत राज , आदर्श गांव, निर्मल ग्राम/ महिला बळकटीकरण/ महिला व बाल विकासाचे उपक्रम इ. विषयांची माहिती घेणेसाठी अभ्यास सहलीचे आयोजन केले जाते. |
| ४ | ग्रामिण भागातील अंगणवाडयांना साहित्य पुरविणे. ***(इलेक्ट्रॉनिक वजनं काटे)*** | २५.०० | ० ते ६ वयोगटातील मुलांचे वजनं घेणे करीता वजनं काटे पुरविले जातात. |
| ५ | ग्रामीण भागातील १० वी १२वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी चे संगणक प्रशिक्षण देणे. | ५८.०० | संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करणेसाठी १०वी व १२वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी व समकक्ष अभ्यासक्रमचे ज्ञान दिले जाते. |
| ६ | ग्रामीण भागातील आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशिन पुरविणे. | २१.०० | ग्रामीण भागातील, दारिद्रय रेषेखालील महिलां करिता ही योजना राबविली जाते. |
| ७ | ग्रामीण भागातील आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देणे. | २.०० | प्रत्येक प्रकल्पातील ३ सेविका व जिल्ह्यातून ३ सेविका अशा ५१ सेविकांना समितीच्या निर्णयानुसार पुरस्कार दिला जातो. |
| ८ | कुपोषण निर्मुलन कार्यक्रम. | १.०० | --- |
| ९ | मुलींना स्वयं संरक्षणासाठी व त्यांच्या शाररिक विकासासाठी प्रशिक्षण योजना. | १०.०० | या योजने अंतर्गत मुलींना कराटे/ योगाचे प्रशिक्षण देण्यात येते. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिक दृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना किमान ३ महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येते. |
| १० | इयत्ता ५वी ते १०वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींना मोफत सायकल पुरविणे. | २९.०० | दुर्गम भागात किंवा इतर ठिकाणी विद्यार्थीनींना त्यांच्या राहत्या गावापासून ज्या ठिकाणी कमीतकमी २ किलोमिटर अंतर चालत जावे लागते अशा विद्यार्थीनींना मोफत सायकल पुरविण्याची ही योजना आहे. |
| | | **१५२.००** | |

**अहमदनगर जिल्हा परिषद, महिला व बालकल्याण विभाग**
**जि.प.सेस मधील योजना, सन २०११-१२ प्रारूप आराखडा**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचा शासन निर्णय दिनांक १०.३.२०११**

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेच्या अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महिलांसाठी समुपदेशन / मदत केंद्र चालविणे | १) कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसिक दृष्टया असंतुलीत महिलांच्या सामाजिक, मानस शास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी, या साठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा.<br>२) समुपदेशक व सल्लागाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, ज्युडीशियल मॅजीस्ट्रेट इत्यादी अधिका-यांच्या समिती मार्फत करण्यात येईल. |
| २ | महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा | १) महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा दौरा राहिल.<br>२) पाणलोट क्षेत्र, बचत गटांचे कामकाज, चांगल्या योजनांच्या अंमलबजावणीचा अभ्यास ई.कार्यक्रम. |
| ३ | अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे | १) अंगणवाडयांसाठी वजनकाटे व जलशुध्दीकरण यंत्र याचा समावेश करावा. |
| ४ | दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे. | १) १०वी व १२वी पास मुलींना एम.एस.- सी.आय.टी व समकक्ष अभ्यासक्रम उदा.डाटा एंट्री ऑपरेटर प्रशिक्षण देण्याची योजना. |
| ५ | ग्रामीण भागातील आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशिन पुरविणे. | १) ग्रामीण आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशिन पुरविणे.<br>२) वार्षिक उत्पन्नाची अट मर्यादा २०,०००/-.<br>३) या पूर्वी इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतला नसल्याबाबतचे प्रमाण पत्र आवश्यक.<br>४) शिवणक्लास झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| ६ | आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार देणे. | १) अंगणवाडी मध्ये उत्कृष्ट काम करणा-या सेविकांना समितीस स्वतःच्या निधी मधून पुरस्कार देता येईल.<br>२) योजनेवर जास्तीत जास्त २ लक्ष पर्यंत खर्च करण्यात येईल. |
| ७ | कुपोषण निर्मुलन कार्यक्रम. | ---- |
| ८ | इयत्ता ५वी ते १०वी पर्यंत शिकणा-या मुलींसाठी सायकल पुरविणे. | १) दुर्गम भागात किंवा इतर ठिकाणी विद्यार्थीनींना त्यांच्या राहत्या गावा पासून ज्या ठिकाणी कमीतकमी २ किलोमिटर अंतर चालत जावे लागते या बाबत मुख्याध्यापकाचा दाखला आवश्यक.<br>२) लाभ देतांना दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील पात्र विद्यार्थीनींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.<br>३) वार्षिक उत्पन्नाची अट मर्यादा २०,०००/-.<br>४) या पूर्वी इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतला नसल्याबाबतचे प्रमाण पत्र आवश्यक. |
| ९ | मुलींना स्वंय सरंक्षणासाठी व त्यांच्या शाररिक विकासासाठी प्रशिक्षण योजना | १) या योजनेत मुलींना कराटे, व योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे.<br>२) कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिक दृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे.<br>३) सदरची योजना तालुकास्तरावर गट विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व गट शिक्षण अधिकारी यांच्या समन्वयाने राबविण्यात येते.<br>४) प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे किती लाभार्थी रुपये ३००/- प्रतिमाह पर्यंत खर्च करण्यात यावा. |

महिला व बाल कल्याण विभाग
जिल्हा परिषद अहमदनगर
जा.क्र.एबाविसे/कार्या-८/    /११
दिनांक १६/९/२०११

प्रति,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहमदनगर.

विषय :- विभागाची माहिती अद्यावत करणे बाबत.

संदर्भ :- आपले कडील पत्र जा.क्र.संगणक कक्ष/वेबक/७८८/११ दिनांक १५.९.२०११.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महिला व बाल कल्याण विभागाची संकेत स्थळावरील माहिती सादर करत आहे. सदर माहिती योग्य व अचूक आहे व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यास हरकत नाही.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी** *(बा.क)*
***जिल्हा परिषद अहमदनगर***

## महिला व बाल कल्याण विभाग – जिल्हा परिषद अहमदनगर - सन २०११-१२
## विभागांतर्गत राबविण्यात येणा-या योजना (जिल्हा परिषद सेस)

**माहे सप्टेंबर २०११ अखेर** *(रुपये लाखात)*

| अ.क्र | योजनेचे नांव | सन २०११-१२ | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | तरतूद | खर्च | |
| १ | बाल कल्याण / एबाविसे योजनेतील साहित्य खरेदीसाठी जाहिरात खर्च व इतर सादिल. | ३.०० | ००.०० | |
| २ | महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे. | ३.०० | ००.०० | प्रशासकीय मान्यता प्राप्त. |
| ३ | महिला लोक प्रतिनिधी अभ्यास दौरा. | १.०० | ००.०० | |
| ४ | ग्रामीण भागातील अंगणवाडींना साहित्य पुरविणे.(इलेक्ट्रॉनिक वजनं काटे) | २५.०० | ००.०० | पुरवठा आदेश दिला. |
| ५ | ग्रामीण भागातील १० वी व १२वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी चे संगणक प्रशिक्षण देणे. | ५८.०० | ००.०० | प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त. |
| ६ | ग्रामीण भागातील आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशिन पुरविणे. | २१.०० | ००.०० | प्रशासकीय मान्यता प्राप्त. |
| ७ | ग्रामीण भागातील आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देणे. | २.०० | ००.०० | प्रशासकीय मान्यता प्राप्त. |
| ८ | कुपोषण निर्मुलन कार्यक्रम. | १.०० | ००.०० | -- |
| ९ | मुलींना स्वयं संरक्षणासाठी व त्यांच्या शाररिक विकासासाठी प्रशिक्षण योजना. | १०.०० | १०.०० | अनुदान पंचायत समितीकडे वर्ग. |
| १० | इयत्ता ५वी ते १०वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींना मोफत सायकल पुरविणे. | २९.०० | ००.०० | प्रशासकीय मान्यता प्राप्त. |
| | **एकुण** | १५२.०० | १०.०० | |